# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १५६ वा रविवार दि.०१ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## लातूर ग्रामीणची भाजपचा बालेकिल्ला अशीच ओळख निर्माण व्हावी;आजपासून कामाला लागा पोहरेगाव जिप सर्कलच्या सत्कार कार्यक्रमात आ. रमेशआप्पा कराड






लातूर : – विधानसभेची निवडणूक जिंकली एवढ्यावरच न थांबता येणाऱ्या काळात होणाऱ्या ग्रामपंचायत सोसायटीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुका आपल्याला जिंकायच्या आहेत आणि लातूर ग्रामीण मतदार संघाची भाजपाचा बालेकिल्ला म्हणून ओळख निर्माण करायची आहे यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी आजपासूनच कामाला लागावे अशी सूचना नवनिर्वाचित आमदार रमेशआप्पा कराड यांनी दिल्या.


लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांचा घवघवीत यश संपादन केल्यानंतर आज शनिवारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात पोहरेगाव जिल्हा परिषद मतदार संघातील भाजपासह महायुती कार्यकर्त्यांच्या वतीने जाहीर सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी भाजपाचे विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष अँड दशरथ सरवदे, शिवसेनेचे युवा जिल्हाध्यक्ष कुलदीप सूर्यवंशी, अध्यात्मिक आघाडीचे जिल्हा संयोजक ज्ञानोबा भिसे, माजी तालुकाध्यक्ष रामराव मोरे, विठ्ठल कस्पटे, श्रीकृष्ण पवार, सुभाष वाघ, संगमेश्वर स्वामी यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या सत्कार कार्यक्रमास पोहरेगाव जिल्हा परिषद मतदार संघातील गावा गावातील भाजपा सह महायुतीचे कार्यकर्ते मतदार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतः उमेदवार समजून काम केले केलेल्या प्रयत्नाला यश आले याबद्दल सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लातूर ग्रामीण मतदार संघातून देशमुख पराभूत होतील असे कोणालाच वाटत नव्हते मात्र ही लढाई आपण जिंकणार याचा मला आत्मविश्वास होता कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळेच हे शक्य झाले. ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी होती देशमुख यांनी अनेकांना विकत घेण्याचा प्रयत्न केला माझा गरीब कार्यकर्ताच काय तर सामान्य मतदारही विकला गेला नाही. सत्ता आणि पैशाच्या मागे जनता जात नाही विकास कामामागे जनता असते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. काँग्रेस पुढार्‍यांच्या अनेक गावात सामान्य कार्यकर्त्यांनी भाजपाला मताची आघाडी मिळवून दिली याचा मला अभिमान आहे.

विधान परिषदेचा आमदार या नात्याने काम करत असताना मतदारसंघात शेकडो कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आणि गावातील विकास कामांना गती दिली आपण केलेल्या कामामुळेच गावा गावात कार्यकर्त्यांच्या शब्दाला मतदारांनी मान दिला आणि भाजपाच्या पाठीशी राहून भरभरून मतदानरुपी आशीर्वाद दिले. आता विधानसभा आमदारकीच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचं सोनं करून दाखवू असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मतदार संघात गेल्या पंधरा वर्षातील विकासाचा मोठा बॅकलॉग भरून काढायचा आहे यासाठी विकासाचा आराखडा तयार करून विविध कामांना निश्चितपणे मंजुरी मिळून घेऊ. कार्यकर्त्यांनीही सर्व समाज घटकांना सोबत घेऊन गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत कोणाचीही अनुरूप होणार नाही याची काळजी घ्यावी पर्यायाने आपल्या गावचा तालुक्याचा आणि मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधू असेही त्यांनी बोलून दाखवले. प्रारंभी पोहरेगाव जिल्हा परिषद मतदार संघातील अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून भविष्यातील कार्याला शुभेच्छा दिल्या.

## आता १५०० मिळणार की लाडका बहिणींना मिळणार २१०० ? आता लाडक्या बहिणींना पुढच्या हप्त्याची प्रतीक्षा

किनवट/शेख शौकत नुकत्याच विधानसभा निवडणुकीत सगळीकडून महाविकास आघाडी की महायुती सरकार याचेच गणित काढत असताना अनेक जण दिसत होते. परंतु लाडकी बहीण योजना सरकारसाठी गेम चेंजर ठरली असून जुलै २४ मध्ये अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अमलात आणली. या योजनेचे ५ हप्ते पात्र महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. त्यामुळे आता पुढचा हप्ता कधी मिळणार? याची प्रतीक्षा पात्र महिलांना आहे. जुलै २४ पासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यात कार्यान्वित झाली. १५ ऑक्टोबरपर्यंत या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. या योजनेअंतर्गत आतापर्यंत २ कोटी ४० लाख महिला पात्र ठरल्या आहेत तर २ लाख २० हजार महिलांच्या खात्यात आतापर्यंत पैसे जमा झाले आहेत. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर जुलै आणि ऑगस्ट महिन्याचा पहिला आणि दुसरा टप्पा महिलांच्या खात्यात जमा करण्यात आला. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाच्या टक्क्यातही वाढ झाली तसेच महिला मतदारांनीही मोठ्या प्रमाणात मतदान केल्याने महायुतीला फायदा झाला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे केव्हा मिळणार? असा प्रश्न महिला वर्गाकडून केला जात आहे. एवढेच नव्हे तर पुन्हा सत्तेत आल्यास



मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजनेचे पैसे दीड हजारावरून २१०० रुपये करण्यात आले आहेत. आता नव्या हप्त्याचे पैसे मिळताना जुन्या योजना प्रमाणे १५०० रुपये येणार की वाढीव रकमेप्रमाणे २१०० रुपये देणार? असाही प्रश्न महिलांतून केला जात आहे. सप्टेंबर महिन्यातील काही दिवसांच्या फरकाने महिलांच्या खात्यात रक्कम जमा झाला तसेच नोव्हेंबरमध्ये आचारसंहिता लागणार असल्याचे स्पष्ट झाल्याने तत्कालीन महायुती सरकारने तात्काळ अधिसूचना काढून ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे एकत्रित पैसे दिवाळीचा बोनस म्हणून देण्यात आले. त्यामुळे पात्र महिलांच्या खात्यावर आतापर्यंत पाच हप्त्याचे साडेसात हजार रुपये जमा झाले आहेत. दरम्यान निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात थेट आर्थिक लाभ देण्याचा योजनांचा निधी निवडणूक आयोगाने रोखला होता. त्यामुळे ही योजना आता बंद होणार? अशी चर्चा विरोधकांकडून केली गेली. परंतु निवडणुका झाल्यानंतर महिलांना पैसे देण्यात येणारं असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं होतं. २ नोव्हेंबर रोजी दिलेल्या मुलाखतीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, लाडकी बहीण योजनेचे पैसे आचारसंहितेत अडकू नयेत म्हणून नोव्हेंबरचे पैसे ऑक्टोबरमध्ये दिले. दि.२० नोव्हेंरला मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी झाली. त्यामुळे डिसेंबरचे पैसे नोव्हेंबर मध्येच येणार आहेत. कारण आमची नियत स्वच्छ आहे. आम्ही देणाऱ्यातून आहोत. घेणाऱ्यातले नाही. डिसेंबरचे पैसे नोव्हेंबर मध्येच देऊ असा आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. त्यामुळे आता निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर आता पात्र महिलांना डिसेंबरच्या हप्त्याची प्रतीक्षा आहे.

## महायुतीचा ५ डिसेंबरला शपथग्रहन सोहळा

मुंबई : विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून अनेक दिवस उलटून गेले असले तरी अद्याप महायुतीने सरकार स्थापनेचा दावा केलेला नाही. दुसरीकडे मोठा जनाधार मिळूनही महायुती सत्तास्थापनेसाठी करत असलेला उशीर राज्यात चर्चेचा विषय बनला आहे. दरम्यान शनिवार दि. ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर येत्या ५ डिसेंबर रोजी महायुती सरकारचा भव्य शपथग्रहन सोहळा असल्याची अधिकृत माहिती दिली. बावनकुळे यांनी एक्सवर एक पोस्ट शेअर करीत सदर शपथविधी सोहळयाची घोषणा केली आहे. या पोस्टमधून बावनकुळे यांनी शपथविधी सोहळ्याविषयी माहिती दिली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे की, राज्यातील महायुती सरकारचा शपथविधी विश्वगौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत गुरुवार, ५ डिसेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ५ वाजता आझाद मैदान, मुंबई येथे संपन्न होणार आहे. मुख्यमंत्र्यांवर गुढ कायम महायुतीला जनतेने प्रचंड यश दिले. न भूतो असा विजय महायुतीचा झाला. तर, महाविकास आघाडीला जनतेने सपशेल नाकारले. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर आता जवळपास आठवडा आला, तरी महायुतीचे सरकार कधी स्थापन होणार, याबाबत स्पष्टता येत नव्हती.



## लातूर जिल्हा प्रशासनाच्या उपक्रमाचा राष्ट्रीय स्तरावर गौरव !

### दिव्यांग मुलांसाठी सुरु केलेल्या उमंग ऑटिझम सेंटरला 'स्कॉच अवॉर्ड'

**'उमंग'शी संबंधित सर्वांसाठी हा पुरस्कार प्रेरणादायी : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे**

उमंग ऑटिझम सेंटरला राष्ट्रीय स्तरावरचा 'स्कॉच अवार्ड' मिळाला असून जिल्हा प्रशासन, सिद्धिविनायक प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून दिव्यांग मुलांसाठी सुरु असलेल्या कामाची ही पावती आहे. जास्तीत जास्त दिव्यांग मुलांवर उपचार व्हावेत, त्यांच्यातील दिव्यांगत्वाचे वेळीच निदान व्हावे, यासाठी 'ऑटिझम सेंटर ऑन व्हिल' ही संकल्पना राबविली जात आहे. या पुरस्कारामुळे दिव्यांग मुलांसाठी अधिक जोमाने काम करून जास्तीत जास्त मुलांवर उपचार होण्यासाठी उमंग ऑटिझम सेंटरच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील. या सेंटरशी जोडले गेलेल्या प्रत्येकासाठी हा पुरस्कार प्रेरणादायी आहे, असे मत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी व्यक्त केले.

लातूर :- जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग आणि सिद्धिविनायक प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने सुरु करण्यात आलेल्या उमंग ऑटिझम अँड मल्टीडीसिबिलिटी रिसर्च सेंटरला राष्ट्रीय स्तरावरील 'स्कॉच अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सिद्धिविनायक प्रतिष्ठानचे डॉ. प्रशांत उटगे यांनी नवी दिल्ली येथे झालेल्या समारंभात हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्कारामुळे जिल्हा प्रशासनाने दिव्यांग मुलांसाठी राबविलेल्या उपक्रमाचा राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला आहे.

'स्कॉच अवॉर्ड' या प्रतिष्ठित पुरस्कारासाठीचार टप्प्यात झालेल्या मूल्यांकनात प्रथमत: ज्यूरी मूल्याकंनामध्ये व्हिडिओ, पीपीटी, छायाचित्रे आणि केस स्टडीमार्फत मूल्यांकन झाले. त्यानंतर मतदानाची पहिली फेरी आणि निवड विश्लेषकांमार्फत करण्यात आले. निवड केलेले प्रकल्प तज्ज्ञांकडून तपासून मूल्यांकन आणि मुलाखतीद्वारे पुढे पाठविण्यात आले. दुसऱ्या टप्प्यामध्ये या प्रकल्पाबाबत तज्ज्ञांची मते मागविली. तिसऱ्या टप्प्यात संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ यांनी प्रदर्शन आणि थेट मतदानाद्वारे प्रकल्पाची निवड केली. चतुर्थ आणि अंतिम टप्प्यात ऑनलाईन प्रदशर्नामध्ये जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे प्रकल्पाविषयी माहितीचे सादरीकरण केले. त्यानुसार देशभरातील तज्ज्ञांनी उमंग ऑटिझम सेंटर या प्रकल्पाची पुरस्कारासाठी निवड केली. लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाठीमागे शासकीय वसाहतीत असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या जागेत जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग आणि सिद्धिविनायक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने उमंग ऑटिझम सेंटर अँड मल्टीडिसिबिलिटी रिसर्च सेंटरची स्थापना करण्यात आली. जिल्हा प्रशासनाने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून या उपक्रमास निधी उपलब्ध करून दिला होता. त्याचबरोबर विविध खाजगी संस्था कंपन्या यांनी सीएसआरच्या माध्यमातून हे केंद्र उभारणीस मदत केली आहे.




या ठिकाणी ऑटिझम (स्वमग्नता), बहुविकलांगता, सेरेब्रल पाल्सी, बुध्यांक मापन, अति चंचलपणा, या सारख्या दिव्यांगत्वावर उपचार करण्यासाठी तसेच अस्थिव्यंग असलेल्या बालकांना थेरपी देण्यासाठी विविध अद्यावत व सुसज्ञ उपचार पद्धती उपलब्ध असून त्यात मानसिक व शारिरीक दुर्बल बालकांसाठी सर्व प्रकारच्या न्युरोलॉजीकल ट्रीटमेंट, अर्ली ईन्टरवेन्शन, ऑक्युपेशनल थेरपी, फिजोओथेरपी, स्पीच थेरपी, बिव्हेवीरल थेरपी, रिमेडिअल थेरपी, सायकोलॉजीकल थेरपी, सेन्सरी ईन्टीग्रेशन थेरपी, स्पेशल एज्युकेशन, ह्यॅड्रो थेरपी आणि त्यासोबतच विविध वैद्यकीय तपासणीची सुविधा यांचा समावेश आहे.

उमंग ऑटिझम सेंटरच्या माध्यमातून आतापर्यंत ऑक्युपेशनल थेरपी, फिजोओथेरपी, स्पीच थेरपी, बिव्हेवीरल थेरपी, रिमेडिअल थेरपी, सायकोलॉजीकल थेरपी, सेन्सरी ईन्टीग्रेशन थेरपी, यांच्या मदतीने जवळपास ७ हजार ९३६ दिव्यांग मुलांवर उपचार करण्यात आले आहेत.

अशा प्रकारचे ऑटिझम सेंटर केवळ मुंबई, पुणे, हैदराबाद यासारख्या मोठ्या शहरांमध्येच उपलब्ध असून येथील उपचारपद्धती अतिशय महागड्या असतात. परंतु, उमंग ऑटिझम सेंटरच्या माध्यमातून लातूरसारख्या शहरात या सर्व उपचार पद्धती अत्यंत कमी दरात उपलब्ध करून देण्यासाठी 'पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप'मध्ये स्थापन झालेले केंद्र अत्यंत उत्कृष्टपणे कार्यरत आहे. या कार्याची दखल घेवून या केंद्राचा राष्ट्रीय स्तरावर सन्मान झाला आहे.

## संपादकीय....

# सत्तेचे अर्थकारण

लोकशाहीत जनादेशाला फार महत्त्व असते. अलीकडच्या काळात मतदारांनी ठोस जनादेश देत निर्णायक भूमिका घेतली आहे. विशेषत: २०२१ नंतर यात आणखी मोठा बदल झाला आहे. राज्यांमध्ये किंवा केंद्रांमध्ये जे सत्तेवर येत आहेत त्यांना देशातील निम्मी लोकसंख्या असलेल्या महिला वर्गाचे भक्कम पाठबळ मिळाल्याचे दिसते आहे. त्यामुळे महिला मतदारच आता राजकीय पक्षांच्या केंद्रस्थानी आल्या आहेत.

निवडणुकीचे राजकारण हे शेवटी मतांची बेगमीच असते. महिला एकहाती निवडणुकीचे चित्र बदलू शकतात याची खात्री झाल्यानंतर महिला मतदारांना खूश करण्याचे प्रयत्न सुरू झाले. यातून सुरू झालेली स्पर्धा आता शिगेला पोहोचली आहे. मात्र, राज्ये त्यातून निर्माण होणारे आर्थिक आव्हान कितपत पेलू शकतील हे पाहणेही महत्त्वाचे ठरणार आहे. सध्याच्या घडामोडी पाहता एकच म्हणावे लागते की, चांगले राजकारण हे नेहमी वाईट अर्थकारणाची पायाभरणी करत असते. महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये वेगवेगळ्या आघाड्यांचा विजय झाला. तरी त्यांच्या विजयात मात्र एक समान सूत्र आहे. या दोन्ही राज्यांमध्ये निवडणुकांच्या अगदी काही महिने अगोदर सुरू केलेल्या थेट लाभ देणार्या योजना व विशेषत: महिलांच्या लाभाच्या योजना हे ते सूत्र.

महाराष्ट्रात लाडक्या बहिणींनी चमत्कार घडवला. जेमतेम १०० ते १२५ दिवसांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत ज्या महायुतीला मतदारांनी डबल इंजिनचे आमिष असूनही नाकारले होते, त्याच महायुतीला लाडक्या बहिणींनी केवळ चारच महिन्यांत अविश्वसनीय बहुमत प्रदान केले. झारखंडमध्येही हेमंत सोरेन सरकारने निवडणुकीच्या तोंडावरच 'मैय्या सन्मान' योजना सुरू केली. महिलांना दरमहा १ हजार रुपये देणार्या या योजनेने सोरेन यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली झालेला तुरूंगवास हा त्यांच्यावर अन्याय होता असे मानावे लागेल. इतपत सोरेन यांच्यावर विश्वास ठेवत त्यांची सत्तावापसी केली. महायुतीने आता लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा केली आहे. तर झारखंडमध्येही 'मैय्या सन्मान' योजनेची रक्कम १ हजारवरून २५०० पर्यंत नेली जाणार आहे. याचा सरळ अर्थ असा आहे की या योजनांच्या अंमलबजावणीत राज्यांच्या तिजोरीवर मोठा ताण पडणार आहे.

निवडणुकीच्या वेळी मतदारांना आमिष दाखवण्याचा पायंडा खूप जुना आहे. जी आश्वासने पूर्ण करता आली नाही किंवा होऊ शकली नाही त्यांची प्रिंटिंग मिस्टेक अथवा जुमला अशी सांभावना खुद्द आश्वासन देणार्यांनीच केली होती, हा इतिहास सगळ्यांना ज्ञात आहे. तथापि, आता प्रत्यक्ष रोख रक्कमच खात्यांमध्ये जमा केली जाते आहे. पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, हरियाणा आणि आता महाराष्ट्र व झारखंड या दोन राज्यांत महिलांना दिला जाणारा थेट लाभ आणि त्यामुळे महिलांनी दिलेला निर्णायक कौल यामुळेच लोकप्रियता ओहोटीला लागलेली सरकारे तगली आहेत. हाच अलीकडच्या धक्कादायक निकालांचा सार. या सर्व राज्यांमध्ये सरकारविरोधी नाराजीची पाटी पूर्ण पुसून कोरी केली गेली. जेव्हा एखादे सरकार सलग सत्तेवर असते तेव्हा त्याला मतदारांच्या नाराजीचा सामना करावाच लागतो. या नाराजीवर लक्ष्मी भंडार योजनेमुळे बंगालच्या ममता बॅनर्जी यांना मात करता आली.

मध्य प्रदेशात भाजपच्या सरकारच्या दोन दशकांच्या राजवटीविरोधात नाराजीची लाटच होती. 'लाडली बहना' योजनेने ती लाट तर संपवलीच, पण योजना बंद होणार नाही किंवा करता येणार नाही एवढे भक्कम संख्याबळ भाजपला दिले. कर्नाटकात काँग्रेसची 'गृहलक्ष्मी योजना', तेलंगणात 'महालक्ष्मी योजना' झाली आणि येथील गृहलक्ष्मींनी दोन्ही राज्यांतील सत्ता काँग्रेसला बहाल केली. शेतकरी, ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू केलेल्या अन्य योजना सत्ताधार्यांसाठी बोनस मिळवून देणार्या ठरल्या. निवडणूक आयोगाने दिलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत यंदाच्या निवडणुकीत महिलांचे मतदान ५२,५८,६७१ एवढे वाढले. झारखंडमध्ये ८१ विधानसभा मतदारसंघांपैकी ६८ मतदारसंघांमध्ये महिलांचे मतदानाचे प्रमाण हे पुरुषांपेक्षा जास्त आहे. आणखी एक आकडेवारी असे सांगते की, महाराष्ट्रात आता लाडक्या बहिणींना दिली जाणारी रक्कम २१०० रुपये करण्यात आली, तर त्याकरता राज्याला अतिरिक्त निधी उभारावा लागेल.

दरमहा साधारण पाच हजार कोटी रुपयांचा हा खर्च आहे. सरकारने ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केल्याचे सांगण्यात आले. हे पैसेही कर्जाद्वारे उभे केले गेले आहेत. राज्यावर अगोदरच ९ लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. लाडके भाऊ आणि अन्य योजनांसाठी वर्षाला अतिरिक्त ६० हजार कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. जे महाराष्ट्रात होणार तेच अन्य राज्यांतही होणार आहे. मध्य प्रदेशपुरते बोलायचे झाले, तर या राज्याने वर्षभरातच ४९ हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे. इतर राज्यांवरही बोजा पडत असल्याच्या बातम्या रोजच येत आहेत. लाभार्थींना थेट रोख रक्कम दिल्यामुळे त्यांच्या मूलभूत गरजा भागवता येण्यास मदत होते, असे सांगत काही जागतिक संस्थांनी भारतात सुरू असलेल्या या योजनांची प्रशंसाही केली होती. मात्र त्यांनी जेव्हा प्रशंसा केली होती त्यावेळी एकटे केंद्र सरकार थेट आर्थिक मदत देत होते.

आता प्रत्येक राज्यात सरकार टिकवण्याचे हुकुमी साधन म्हणून थेट लाभाच्या योजना सुरू केल्या जात असल्यामुळे आर्थिक गणित बिघडणारच नाही तर कोलमडणारही आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानव कल्याणाचे शिल्पकार....

देशातील विषमता, द्वेष, भेदभाव मातीत गाडून माणसाला माणूस म्हणून समान हक्क अधिकार देऊन प्रत्येक माणसाला सारखेच महत्त्व निर्माण करण्याचे काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्येक कार्यावर, त्यांनी मांडलेल्या विचारावर आपण संशोधन केले तर खुप गहन विषय तर आहेतच परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात आणि विचारात एकुणच मानवाचे कल्याण असल्याचे सिद्ध होते. हजारो वर्षांपासून सर्वच व्यवस्था स्वतः कडे ठेवून इतरांचे हक्क अधिकार, मानवी स्वातंत्र्य व विकासाचे द्वार बंद करून स्व श्रेष्टत्व जोपासणाऱ्या मनोविकृत लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य न पटणारे आहे. कारण हजारो वर्षांपासून चालत आलेली व्यवस्था उध्वस्त करून सर्वसामान्य लोकांना समान संधी व देशाच्या संपतीत समान वाटा निर्माण करून देणारे डॉ एकमेव महामानव होत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे ज्यांची व्यवस्था उध्वस्त झाली ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विरोध करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चुकिची मांडणी करण्यात कणभरही मागे सरकत नाही. प्रत्येक वेळी मनुवादी लोकांकडून व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेणाऱ्या लोकांकडून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची मांडणी एकतर्फी व मर्यादित करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समजून घेतल्या गेलेच नाही. देशामध्ये बहुसंख्य असलेल्या ओबिसी वर्गाने अपवाद वगळता डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्य याकडे पाठ फिरवली आहे. ओबीसी वर्गाने डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्य जाती धर्मापलिकडे जाऊन समजून घेतले असते तर आज देशातील प्रत्येक संविधानीक संस्थेवर ओबिसीचा प्रभाव असता. या देशा मध्ये जाती व्यवस्था बळकट करून माणसाच्या विभाजनाच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक आणि आर्थिक मलई खाणारा वर्ग खुप सक्रिय आहे. हा वर्ग जाती, धर्म व पंथाचा वेळोवेळी विपर्यास करून माणसा माणसा मध्ये दुरावा निर्माण करून स्वतः ची झोळी भरत असतो. आज पर्यंत ज्यांनी माणसाच्या कल्याणासाठी, वैज्ञानिक व तर्कशुद्ध पद्धतीने समाजात जनजागृती केली त्या सर्व मानवतावादी व क्रांतीकारी नायकांना जातीत बंदीस्त करून त्यांचे कार्य मर्यादित करण्याचे काम केले गेले. ज्यांनी महापुरुषांना डोक्यावर घेतले त्यांनी सुद्धां महापुरुषांना जातीच्या बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करताना दिसत नाहीत. डॉ बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने ओबीसी चे जनक व कल्याणाचे शिल्पकार आहेत. भारतीय संविधानात ओबीसी शब्द व ओबीसी साठी कलम ३४० समाविष्ट करण्यासाठी तत्कालीन ओबीसी नेत्यांनीच विरोध करावा या पेक्षा जास्त शोकांतिका कोणती असु शकते. तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर ना ओबीसी शब्द संविधानातुन बाहेर काढत ना ३४० कलम हटवतात. याच दुरदृष्टी व कल्याणाकारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे ओबीसी बांधवांना आज सोन्याचे दिवस आले आहेत. आजही काही वेळी ओबिसींना डावलून तेथे प्रस्थांपितांना संधी दिली जाते हा धुर्तपणा सुरू असला तरीही आजपर्यंत च्या ओबिसींच्या विकासाला डॉ बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्यच कारणीभुत आहे हे मान्य करावे लागेल. बऱ्याच ओबीसी लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकर हिंदु विरोधी वाटतात. परंतु जेव्हा आपण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार समजून घेतो, डॉ बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तीमत्वाला जेव्हा जाणून घेतो तेव्हा असेच लक्षात येते कि डॉ बाबासाहेब आंबेडकर हे कोणत्याही जाती धर्माच्या विरोधात नसुन ते सत्य, विज्ञान, समता, न्याय व बंधुता यांच्या सोबत होते व कार्य रुपाने आजही आहेत. आता सत्य, विज्ञान, समता, न्याय व बंधुता यावर काम करणे जर धर्म विरोधी वाटत असेल तर प्रत्येकाने आपली बुद्धी तपासने आवश्यक आहे. दुसरी कडे काही ओबीसी वर्ग डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर केले म्हणून थोडे दुर गेले असे सांगण्याचा निरागस प्रयत्न करतात. परंतु एकाद्याचे काम केवळ कोणत्या धर्मात आहे म्हणून स्विकारत असाल तर हि मानसिक गुलामी व द्वेष भावना आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरीती व रुढीपरंपरे मध्ये बदल करून माणव कल्याणाचे तत्व धर्मात असायला पाहिजे असे अनेक वेळा नमुद केले. परंतु धर्माच्या अनिष्ट चालीरीती व विषमता, जातीभेद दुर करायला कोणीही तयार होत नव्हते. तसेच अंधविश्वास आणि पाखंडाचा संबंध धर्माशी जोडून लोकांना अंधविश्वासात ढकलण्याचे काम केले जात होते. बरं अंधविश्वास, समता, बंधुता, न्याय व विज्ञान यावर फक्त बाबासाहेब आंबेडकर हेच बोलले का? तर नाही अनेक संत, महापुरुष डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अगोदरही वरील मुद्यांवर बोलले आणि विषेश म्हणजे त्यांनी धर्मांतर सुद्धां केले नाही तरीही ओबिसी बांधवांनी त्यांचे विचार आजही स्विकारलेले नाहीत अथवा त्यांना घरामध्ये आणले नाही. महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज, संत रविदास महाराज, संत चोखामेळा असे अनेक नावे आहेत जे मानव कल्याणासाठी लढले परंतु मनुवादी मानसिकता असलेल्या लोकांनी त्यांना अजूनही घरात घेतले नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समजून घेऊन त्यांच्या विचाराने मार्गक्रमण केले तर प्रत्येक भारतीयांचे कल्याण होते. फक्त माणसाचा समता, बंधुता, न्याय व मानवी स्वातंत्र्यावर विश्वास पाहिजे. शेतकरी प्रश्न असतील, विद्यार्थी प्रश्न असतील, महिला प्रश्न व हक्क अधिकार असतील यावर प्रभावी पणे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी काम केले आहे. परंतु जातीधर्माचा चष्मा आणि डोक्यात विषमतेची घाण असलेल्या लोकांना जगातील सर्वात महान व्यक्ती कसा कळेल. मौल्यवान वस्तुची किंमत होण्यासाठी स्वतः कडे सुद्धां एखादा मौल्यवान गुण असावा लागतो. डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेतांना आपल्या कडे शिक्षण, विज्ञान, तर्कशुद्धता व प्रचंड बुद्धीमत्ता आवश्यक असते. ज्या ज्या ओबिसींना डॉ बाबासाहेब आंबेडकर कळाले त्यांच्या जिवनाचे सोनं झाले. परंतु ओबिसी सह सर्वच जन मानसाचे कल्याण करणाऱ्यांना, मानवाला जागृत करणाऱ्यांना कधीच आपले मानत नाहीत, ज्यांनी हक्क अधिकार व मानवी स्वातंत्र्य बहाल केले त्यांच्या उपकाराची जाणीव लोकांना नाही. परंतु जे जाती धर्माच्या नावाखाली लाचार, गुलाम आणि भिकारी बनवतात त्यांच्या लोक पाया पडतात. आणि जे महापुरुष हातात लेखणी देऊन, जिवनात ज्ञानाचा सुर्य देऊ सर्व सामान्य जनतेला अधिकारी बनवतात अशा महापुरुषांच्या समोर नतमस्तक व्हायला लाज वाटत असेल तर ही नैतिक बेईमानी आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे देशातील प्रत्येक मानसाच्या कल्याणाचे काम करून हजारो वर्षांपासून शिक्षण, हक्क, अधिकार, व वेगवेगळ्या सत्तांपासुन दुर ठेवले होते ते सर्व काही फुकटात देतात. तरीही आजही त्याची जाणीव नाही म्हणून आजही गुलामीचे व लाचारीचे जिवन जगावे लागत आहे. ज्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर, त्यांचे कार्य व त्यांनी दिलेले हक्क अधिकार याची जाणीव आहे तेच लोक स्वाभिमानी बनून आपल्या पिढ्यांचे कल्याण करत आहेत. बाकीचे लोक धर्माच्या व जातीच्या नावाखाली राज्यकर्त्यांच्या भल्यासाठी हातात दगड घेऊन दंगली पेटवून धुर्त लोकांच्या राजकीय कल्याणाकरीता स्वत:चे आयुष्य उध्वस्त करत आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक मानवाला जागृत करून देशाप्रती आपली भावना ही एकच असली पाहिजे, आपण जातीधर्मा पेक्षा जास्त देशाला महत्त्व दिले पाहिजे म्हणून प्रत्येक भारतीय नागरिकांवर नैतिक संस्कार घालतात व डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वतः म्हणतात मी प्रथम आणि अंतिमतः भारतीय आहे. यावरून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे देशा प्रती, देशातील जनतेप्रती किती मोठे कार्य असेल याची जाणीव होते. संविधाना पुर्वी व देशा मध्ये ओबीसी सह इतरही समुहांकडे आर्थिक व शैक्षणिक कमाई काहीच नव्हती. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण देशच सर्वसामान्य माणसाच्या नावावर करून, सर्वच जाती धर्मातील व श्रीमंत– गरीब लोकांना समान करून सामाजिक क्रांती केली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखा मानव उद्धारक, बुद्धिमान, उच्च शिक्षीत, नितीवान व निस्वार्थी महापुरुष दुसरा होणे शक्य नाही. याच व्यक्तीकडे बघून स्वतः चे आयुष्य जरी बदलले आणि प्रत्येकांच्या मनात मी भारतीय असल्याची भावना जरी रुजवल्या गेली तरी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन होईल व आपण जागृत व नितीवान नागरिक आहोत याची प्रचिती येईल... डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला, विचारांना, बुद्धीमत्ता व राष्ट्रप्रेमाला विनम्र अभिवादन..

******

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# आम्हाला बदल हवाय.. !

आंबेडकर चळवळीत जनता वेडी की खुळी..? आहे असं कुणी प्रश्न विचारला तर त्याचं उत्तर अजूनही होय असं देता येईल. खरं तर आमच्यासारख्यानं ह्यापेक्षा कोणतं उत्तर द्यावयाचे बरं. निवडणूक आली की पैसे मिळतात, गुपचूप बाजार चाले पैशांचा अन विसर पडतो समस्यांचा. असं असल्यावर स्वाभिमानी बनायचं की बेईमान व्हायचं. ह्याचंही उत्तर लगेच सापडतं नेत्याकडे पाहिल्यावर. अहो त्यांचे नेतेच इतके की पायलीचे पन्नास असतात. झोलर! झोळ्या घेऊन फिरणारे. जुनं ते सोनं म्हणतात. आता तेही रोडवत चाललंय. नवं येईल ते येरे माझ्या मागल्या अन ताक कण्या चांगल्या याप्रकारचं असलं तर...? वाजले की बारा! असं म्हणण्याची वेळ त्यांचेवर येईल. पण ते नसावं.

लोकसत्ता विशिष्ट लोकांच्या हाती दिल्यावर होय, दिल्यावर याजागी गेल्यावर म्हणणे अगदी बरोबर वाटतो. अहो ज्यांचे हाती ससा तो पारधी या न्यायानं पाहिल्यास ते लोकं विशिष्ट असतात. मग भोगा आपल्या कर्माची फळं अशी वेळ येते.आपल्यावर वेळ आली म्हणणे बरोबर होईल. काहींनी दीक्षा घेतली की नाही हे माहित नाही पण राजकारणात मात्र भिक्षा मागत फिरतात. ही वेळ आपल्यावर आपणच आणली. साधा पण बहुमोलाचा संघटित व्हायचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरच देतात, तो दुर्लक्षुन आपण आधीच दुर्बल त्यातही संघटित नसलेले समाजात नेते म्हणून मिरवतातच कसे ? संविधान असून त्याची सर्वस्वी जवाबदारी विषम व्यवस्थेच्या हाती असते ते काय समतेचं तत्व जतन करणार कपाळ ?

धर्माला प्राधान्य देऊन लोकप्रतिनिधी निवडला जातो. आम्हाला लोकशाही राज्यात वेगळे करून विषमतावाद्याना धर्माचे आधारे सत्तेवर जाता येणे सहज शक्य होतं आलेले आहे. ओबिसी–र्नीं–ील वर्ग बहुसंख्येने धर्माला प्राधान्य देत असतो.

आम्ही खरं सांगायचं तर स्थिर नसून अद्यापही अस्थिर आहोत. काहीं बौध्द आणि काहीं आंबेडकरी. त्यात आमुच्या संघटनाच भरपूर तशा आमच्यातील मतं ही भरपूर. त्याची गोळबेरीज करुन सांगणारेही भरपूर. त्यांची इतकी तर आमची इतकी संख्या. त्यांची कमी आणि आमची जास्त. असं ऐकून ऐकून कान विटले, विटतात. परंतु निवडणुकीत सारेच फसतात. ते खुर्चीवर आणि आम्ही बसतो बारदानावर. बारा बलुतेदाराला बसण्याची जागा तिच असते. बारा बोड्याचे म्हणतात ते उगाच नाही. समजलं ! यांत राग येण्यासारखं काय आहे त्यात. अहो बारा घरचं खाल्ल्यावर बारा बोड्याच होतं या अर्थानं त्याचा अर्थ घ्यावा बरं ! असं बोलायचं धाडस यासाठी करतो की आपल्यातील जाणीवा जागृत व्हाव्यात, त्या जागृत झाल्या की आपणच कां असे ? असा प्रश्न आपल्याला पडेल. मग त्याचे उत्तर शोधायला लागल्यावर उत्तर मिळेल. मग मी माणूस तो माणूस. असं असल्यावर मला सिंहासनावर कां जाता येत नाही. मी कां नाही तेथे ? मग पुन्हा प्रश्न. मग त्याचे उत्तर मिळते. मला शिकले पाहिजे. होय मला शिकले पाहिजे. मग ऐकलेली भाषणे, वाचलेली पुस्तकें आठवतात. मग महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब यांनी दिलेली शिकवण आठवते.

अविद्या नुकसानीचे कारण आहे आणि त्याचीच री ओढून शिका सांगणारे हे दोन महापुरुष जन्मास आले आणि त्यांनीच बहुजनांचा उद्धार केला. एवढं कळूनही आमचं गबाळेपण जाता जात नाही. याचे कारण लोकशाहीचा अर्थ सर्वार्थानं आम्ही समजून घेत नाही. ज्यांची संख्या भारी तो राज्य करी..! पण राज्य कारभार मूठभर पाहतात ते तर चिमूटभर आहेत. तरीही हे चालते ते धर्माच्या नावाने आणि त्याची संख्या मोठी असते. मग देशात अप्रत्यक्षपणे धार्मिकसत्ता काम करते. तिला लोकशाही म्हणता येईल कां ? नाही. स्पष्ट सांगायचे तर लोकशाही कारभाराची मुलतत्वे संविधानात आहेत त्या प्रमाणे राज्यशकट चालावं ही अपेक्षा सद्या भंग पावत चाललेय. मुख्यत्वे धर्मभेदाचे कारण सांगण्या सारखं आहे. तसेच एक प्रसंग असा की संसदेच्या बाहेरील गॅलरीमध्ये जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आचार्य कृपलांनी यांच्या भेटीत आचार्य विचारतात की, बाबासाहेब आज आपण फार आनंदी दिसत आहात त्यावर बाबासाहेब उत्तरले की आज मी आनंदी आहे याचे कारण आज सर्वांना एकाच मताधिकाराचा अधिकार देण्यात यश मिळाले. तेव्हा आचार्य म्हणाले की तुमचे लोकांची मते आम्ही विकत घेऊन राज्य करू. त्यावर बाबासाहेब म्हणतात की जेव्हा माझे लोक जागृत झाले की तुम्हाला त्यांच्याकडे मतांची भीक मागण्यासाठी त्यांचे दारावर जावे लागेल.




आंबेडकर चळवळीत जागृतीच्या कार्याकडे सर्वांनी जास्तीत जास्त लक्ष दिले तर समाज जागृत होईल. आजच्या या निवडणुकीत भ्रष्टाचाराने समाजात थैमान घातलेले होते असे बोलले जात आहे. यावरून समाजाला जाणीवांची गरज आहे. ही जाणीव जागृत करण्यास समाज असमर्थ झालाय कां ? आमच्या दारीं ही उच्चभ्रू सवर्ण, मात्तब्बर लोकं मतांची भीक मागायला येतील. असे बाबासाहेब म्हणालेत. हे त्यांचे विधान खरे होण्यासाठी अजूनही बहुजन जागा कां होत नाही. तो बहुजन मागास वर्ग धर्माला प्राधान्य देऊ लागला तर तो त्या वर्णव्यवस्थेचा पूर्वी प्रमाणे गुलाम ठरेल. संविधानाचे लाभार्थी होऊनही स्वातंत्र्य उपभोगायचं राहून गेलं तर त्याला काय म्हणायचं ? गुलामीची सवय जडलेला गुलाम. त्याच्या धर्माने त्याला गुलाम केलेय. आणखीन एक विशेष असंही म्हणता येईल की हिंदू धर्माच्या चातुर्वण्यात जाण्याची घाई करण्यात आता पुन्हा आमचे बौध्द बांधव करीत असतील तर त्याची कारणे आम्ही शोधली पाहिजेत. पहिले कारण १) बौद्धांमध्ये एक धार्मिक संघटन नाही दुसरे कारण २) धार्मिक संघटनेच्या नियमांचे पालन न करणे, तिसरे कारण ३) संघटनेत सदस्य होण्यास पात्रता लागत नाही. चौथे कारण ४) एकाकडून दुसऱ्या संघटनेत सदस्य होता येते. पांचवे कारण ५) प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सदस्यांच्या तक्रारीचे निवारण केले जात नाही. अशा प्रकारची समाज व्यवस्था काय – डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित होती काय ? ही या तऱ्हेच्या कारणांकडे कुणीही पहात नाही. कुणी बौध्द, कुणी आंबेडकरवादी, कुणी जयभीमवाला स्वतःची ओळख सांगतात, तरीही सवर्ण यांचे महार असे संबोधन करतात. सवर्णात बहुजन मागासलेले यांचा देखील अंतर्भाग येतो. सवर्ण म्हणजे उच्च वर्णाचे लोक असा नव्हे. धर्मान्तर करूनही महारांचे पूर्वी सारखेच आचरण पाहिल्यानंतर त्यांना इतर लोकं महार म्हणूनच उल्लेख करणार, करतात यांत गैर काहीच नाही. पण जे बौद्ध धम्माचे अनुसरण करतात त्यांना मात्र महार शब्दाचा उच्चार करणाऱ्यांचा राग येतो. खरे तर महाराचे वर्तन करणारी लोकं यांस जवाबदार आहेत. त्याच बरोबर अशा प्रकारचे महार त्यांचे सुखदुःखात दोन तऱ्हेचे धार्मिक विधी होत असतात. हिंदूंचे व्रत वैकल्य, उत्सव, सण–सणावळी, जत्रा यात्रा, देवदर्शन, सत्य नारायण पूजा करणे वगैरे.

तसेच लग्न वाढदिवस – मयती प्रसंगी बौध्दचार्याकडून बौद्ध धम्माचा विधी पार पाडणे. अशी धार्मिक व सामाजिक फुटीर स्थिती असलेला समाज त्यांचे धर्माचे पालन करतो तेव्हा कोणती हिंदू लोकं येतात तुमच्या त्या हिंदू धर्माच्या विधीसाठी. हे बदलायला आधी एकजूट व्हायला नको का ? धार्मिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात आपली एकजूट नसल्याचे हे परिणाम आणखीन किती काळ पाहत बसायचं..?

*********

मधुकर मोहिते (कवी लेखक)
नेरूळ नवी मुंबई.

# संकटांची मालिका

मणिपूरला सध्या स्थानिक पातळीवर कुकी आणि मैतेई दरम्यान संवाद सुरू करणे अत्यावश्यक आहे. चर्चेची द्वारे खुली केल्याशिवाय हा वांशिक संघर्ष आटोक्यात येणार नाही.

केंद्राने केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या अतिरिक्त ५० तुकड्या मणिपूरमध्ये तैनात करण्याची घोषणा केली आहे. मणिपूरला सध्या सुरू असलेला हिंसाचार थांबवण्यासाठी ५ हजारांहून अधिक अर्धसैनिक आणले आहेत. मणिपूरमधील गेल्या काही दिवसांतील घटनांमुळे आधीच्या जखमांवरील खपल्या निघून रक्त पुन्हा वाहू लागले आहे. त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे. ज्या क्रूरपणे तेथील प्रतिस्पर्धी जमाती परस्परांचे जीव घेण्यास तयार आहेत, ते पाहता शांतता प्रस्थापित होण्यामध्ये अजून बराच काळ लागणार आहे. दहा कुकी बंडखोरांनी केंद्रीय राखीव पोलीस दल आणि पोलिसांवर हल्ला केला आणि प्रत्युत्तरादाखल झालेल्या गोळीबारात त्यांचा मृत्यू झाला. या कुकींचे शवविच्छेदन अहवाल दडवले जात असल्याचा आरोप करत कुकींनी रुग्णालयासमोर आंदोलन केले.

जिरिबामसह आणखी काही पोलीस ठाणी आता लष्करी विशेषाधिकार कायद्याच्या (अफ्स्पा) कक्षेत आणण्याची अधिसूचना १४ नोव्हेंबर रोजी करण्यात आली. हिंसाग्रस्त जिरिबाम जिल्ह्यातून गेल्या आठवड्यात बेपत्ता झालेल्या तिघांचे मृतदेह सापडल्यानंतर नागरिकांमध्ये उसळलेल्या संतापाचे लोण राजधानी इम्फाळपर्यंत पसरले. मृतांना न्याय मिळण्याची मागणी करणार्या संतप्त निदर्शकांनी तीन मंत्री आणि सहा आमदारांच्या निवासस्थानांना लक्ष्य केले. त्यानंतर प्रशासनाने इम्फाळ खोर्यात संचारबंदी लागू केली व इंटरनेट सेवा बंद करण्यात आली. दरम्यान, मणिपूरमध्ये नॅशनल पीपल्स पार्टीने बिरेन सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. एनपीपीने म्हटलं आहे की, आम्हाला वाटतं की बिरेन सिंग यांच्या नेतृत्वाखालील मणिपूर राज्य सरकार संकटाचे निराकरण करण्यात आणि सामान्य स्थिती पूर्ववत करण्यात अपयशी ठरलं आहे. मणिपूर विधानसभेत बिरेन सिंग यांच्याकडे बहुमत आहे. त्यामुळे एनपीपीने जरी पाठिंबा काढला तरी सरकारला कोणताही धोका नाही.

स्थानिकांच्या वांशिक हिंसाचारात होरपळणार्यांना वाचवण्यासाठी उभ्या केलेल्या सरकारी आश्रय छावण्यांतील निर्वासितांचाही बळी पडत असेल, तर त्यावरून तेथील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येते. संरक्षण दलाच्या कारवाईत काही मारले गेले आणि वर त्यातील काहींना 'दहशतवादी' ठरवण्याचा प्रयत्न झाला.ते कुकी जमातीचे सरंक्षण करण्याकरता उभारलेले ग्राम रक्षक दलाचे शस्त्रधारी होते. त्यामुळे स्थानिक आणखीच संतापले आणि मुख्यमंत्री, अन्य काही नेत्यांच्या घरांवर जमाव चालून गेला.

आजही कुकी आणि मैतेई या परस्परांविरोधात उभ्या ठाकलेल्या जमातींचे 'स्वयंसेवक' विरोधी नागरिकांवर, महिलांवर खुलेआम अत्याचार करताना दिसतात. ते रोखण्याची इच्छा आणि क्षमता राज्य सरकारात नाही. गतसाली सुरू झालेल्या हिंसाचारात तेथील कुकी आणि मैतेई समाजाच्या गटांनी सरकारी शस्त्रागारे लुटली. असे करणार्या सर्वांना शासन करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. पण राज्य सरकार मैतेई 'आपले' म्हणून मैतेईंस अभयदान देत आहे. त्यामुळे या मैतेई पोलीस कुकींस टिपत आहेत आणि त्याचा बदला म्हणून कुकी बंडखोर/शस्त्रधारी मैतेईना मारत आहे. सरकारी कर्मचार्यांतही हा दुभंग उफाळून आला आणि या दोन समाजाच्या कर्मचार्यांनी परस्परविरोधी भागांत काम करण्यास नकार दिला आहे. मणिपुरातील मुख्यमंत्री बीरेन सिंह हे यास जबाबदार आहेत. मणिपुरातील कुकी आणि मैतेई समस्येचा त्यांनी पार खेळखंडोबा केलेला आहे. ते उघडपणे मैतेईंची बाजू घेताना दिसतात आणि आपल्याच राज्यातील कुकी आणि झो समुदायांस वार्यावर सोडण्यात त्यांना काहीही गैर वाटत नाही. आता तर परिस्थिती इतकी हाताबाहेर गेलेली आहे

# आंबेडकरवाद्यांनी आता तरी भानावर यावे..!

कुटुंब आणि समाज यांच्या व्याख्या केल्यास आपणास कळेल की कुटुंब आणि समाज याची वेगळी नियमावली असते. कुटुंब एक समाजाचा घटक, तर अनेक घटकाचा मिळून समाज बनलेला असतो. आणि त्याच समाजाची सार्वत्रिक गोष्ट कुठल्याही एका कुटुंबाच्या मालकीची, वारसाची रहात नाही. जर एखादं कुटुंब आपली ती गोष्ट मालकीची समजत असेल तर ती जे कुणी व्यक्ती असेल तिने समाजात समाजाचे कार्य करणारी म्हणून ती समाजाची होते तिच्यावर कुटुंबाचा हक्क राहत नाही. आणि समाजाने ती स्वीकारली की ती कुटुंबाची रहात नाही. असे म्हणता येईल. जिवंतपणी व्यक्ती कुटुंबाची असते त्याप्रमाणे त्याची मालमत्ता सुद्धा कुटुंबाचीच असते . मात्र त्या व्यक्तीची विचारसरणी समाजाची विचारसरणी होते तेव्हा तिचे सार्वत्रिकरित्या ती सामाजिकच होते. ती वैयक्तिक कुणाची नसते. अर्थात समाजकार्य करताना ती खासगी नसते. त्याकडे व्यापक दृष्टीने पाहणे हेच त्याचे कार्य समाजकार्य होईल. एक गोष्ट लक्षात ठेवावी. सामाजिक कार्यकर्ता अथवा नेता असो त्यांची विचारसरणी ही व्यापक किंवा संकुचित असते तशी ती समाजाने स्वीकार केल्यास समाजाची होते. ती विभाजितही होते. तिला व्यक्तिगतपणे आमची म्हणायचं प्रयोजन काय कामाचे ? राजकारणात विभाजित झालेल्या राजकीय पक्षाला आमचा बाप चोरला, आमच्या पक्षाची निशाणी चोरली वगैरे दुषणे देण्यात काय अर्थ ? अशी ओरड करणारांना परीृ ळपवशव म्हटलेलं चालेल कां ? अशीच काहीशी स्थिती हल्लीच्या राजकारणात प्रामुख्याने दिसून आली. आणि महाराष्ट्रातील निवडणुकीत अशा मानसिकतेचा दारुण पराभव झाला. यावरून व्यक्ती पेक्षा त्याचे विचार श्रेष्ठ असतात हे स्पष्ट होते. हे नुकत्याच झालेल्या निवडणुकीतून सिद्ध झाले.

डॉ. आंबेडकर चळवळीत गेली अडूसष्ट वर्षांत अशाप्रकारचे अनुभव निरंतर चालू आहेत. पराभवानंतर पराभव असे एकामागून एक पराभव असूनही आंबेडकर विचारांशी एकनिष्ठ न होणारांना संघटित व्हावेसे वाटले नाही, वाटतच नाही. याचा अर्थ ते निःस्वार्थ असतात असं नाही म्हणता येत. त्यामागे स्वार्थ हा असतोच. स्वार्थ म्हटला की धन आणि स्वतःचे नावलौकिक हे दोन फॅक्टर त्यात असतात. त्याचा त्याग करता आल्याचं उदाहरण सापडत नाही.याचा परिणाम चळवळीत दिसतो. महामानवाने दिलेला मार्ग व त्यांचे विचारधन दोन्हीचा अभाव असलेली चळवळ असू शकते काय ? जिला आपण चळवळ म्हणतो तिला कोणत्या निकषावर चळवळ म्हणायचं ? सद्या चळवळीची अवस्था निष्प्रभ झालीय आणि आंबेडकर चळवळीतील प्रत्येक राष्ट्रीय नेत्यामुळेच ती अस्थिपंजर झाल्यासारखी वाटू लागलेय नव्हे ती आहेच.




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साथ सोडून जाणारांना त्या वेळी बाबासाहेब म्हणाले आपली झोपडी मोडून दुसऱ्याच्या महालात जाऊ नका आणि तुम्ही गेलात तर मागे फिरून येण्याची वेळ तुमच्यावर आली तर ती झोपडी तुम्हाला परत आश्रय देईल. म्हणून आपली झोपडी शाबूत ठेवा. याची आठवण येण्याचं कारण की नुकत्याच झालेल्या निवडणुकीत घडलेल्या घटना आहेत. एका पार्टीची दोन शकले झाली त्याबद्दलची आक्षेपार्ह विधानं आपण ऐकली. परंतु त्या स्वरूपाची वक्तव्य आम्ही आंबेडकर चळवळीत कधीच ऐकली नाहीत. कुणी कुणाचा बाप चोरला, कुणी कुणाचा पक्ष चोरल्याची बातमी नाही.

डॉ.आंबेडकर व्यक्तिमत्व व्यापक आहे. म्हणून हल्ली सर्वांनी राजकारणात त्यांचा वापर केला.करीत आहेत. त्यांना कुणी चोरले असं म्हणत नाही. परंतु डॉ. आंबेडकरांच्या संकल्पनेचा राजकीय पक्ष त्यांनी चोरल्याचं म्हणता येईल. तो कुणी चोरला व कसा ? ते पाहू या. माझं मत असं आहे की डॉ. बाबासाहेबांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या राजकीय पक्षाची संकल्पना मांडली खरी परंतु त्यांचं महापरिनिर्वाण झाल्यानंतर त्यांची संकल्पना त्यांच्या भीम अनुयायांना यशस्वीरीतीने आकारास आणता आलेली नाही. त्यांनी संकल्पनेची अधिकाधिक शकले करण्यात धन्यता मानली, त्यामुळे मतं विखूरली गेली. पण पक्ष कुणी चोरला वगैरे असे कुणीच म्हटलं नाही. पण उलट असं म्हणता येईल की त्या इंग्रजी नाव असलेल्या पक्षाचं मराठीतलं भाषांतर करून पाहिल्यास भारतीय जनता पक्ष असं आहे. सर्व भारतीयांना सामावून घेणारा पक्ष अशी संकल्पना म्हणजेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया होय. या दोन्ही मधलं साम्य एकच आहे. सहजपणे हाती मिळालेला दस्तऐवज नीट सांभाळता न येणारे अनुयायी आम्ही. म्हणून कुणी कुणाला चोर संबोधण्यापेक्षा थोडक्यात लोकहित महत्वाचे आहे. शेवटी आंबेडकर चळवळ आम्हीच चालवितो असं म्हणणारांना आता तरी आत्मभान येईल कां ?

\-\-\-\-\-\-\-\-\-

मधुकर मोहिते ( कवी लेखक )
नेरूळ नवी मुंबई.

## शरीरात विटामिन बी १२ ची कमतरता भासू नये म्हणून आहारात करा 'या' शाहाकारी पदार्थांचे सेवन, अशक्तपणा होईल कमी

शरीरात कोणत्याही विटामिनची कमतरता निर्माण झाल्यानंतर आरोग्यासंबंधित समस्या उद्भवण्यास सुरुवात होते. चुकीची जीवनशैली, आहारात सतत होणारे बदल, जंक फूडचे सेवन, अपुरी झोप इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यावर दिसून येतो. त्यामुळे चुकीच्या सवयी फॉलो न करता नेहमी आरोग्यदायी सवय फॉलो करणे आवश्यक आहे. शरीरात पोषक घटकांची कमतरता निर्माण झाल्यानंतर आरोग्याला हानी पोहचते. शरीरातील विटामिन बी १२ आरोग्यासाठी अतिशय महत्व आहे, कारण हे विटामिन लाल रक्तपेशी आणि डीएनए निर्मिती करण्यासाठी उपयुक्त आहेत. शिवाय यामुळे आतडे म्यूकोसा आणि त्वचेच्या पेशी निरोगी राहतात, चयापचयात सुधारणा होते, चरबी, प्रथिने आणि कार्बोहायड्रेट्स तयार करण्यासाठी विटामिन बी १२ अत्यंत महत्वाचे आहे. शरीरामध्ये विटामिन बी १२ ची कमतरता निर्माण झाल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवण्यास सुरुवात होते. शिवाय यामुळे सतत थकवा जाणवणे, तोंडात व्रण, विस्मरण, मूड बदलणे, अस्वस्थता, हातापायला सतत मुंग्या येणे, त्वचा पिवळी पडणे, केस पातळ होणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. त्यामुळे खाण्यापिण्याच्या सवयींकडे लक्ष देऊन आरोग्याची योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. आज आम्ही तुम्हाला शरीरात निर्माण झालेली विटामिन बी १२ ची कमतरता भरून काढण्यासाठी कोणत्या पदार्थांचे आहारात सेवन करावे, याबद्दल सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया. विटामिन बी १२ ची कमतरता भरून काढण्यासाठी 'या' पदार्थांचे करा सेवन: काजू: विटामिन बी १२ ची कमतरता भरून काढण्यासाठी नियमित काजूचे सेवन करावे. काजूमध्ये असलेले गुणधर्म विटामिन बी १२ल ची कमतरता भरून काढतात. शिवाय काजू पोटातील ॲसिडिटीला प्रतिबंध करतात. दूध आणि काजूचे सेवन केल्यामुळे शरीराचा रक्तदाब नियंत्रणात राहतो.

# एचआयव्ही विरुद्धच्या लढ्यात सहभागी होऊ या

दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून पाळला जातो. जगभर पसरलेल्या एड्स या जीवघेण्या रोगाबद्दल जगभर जनजागृती व्हावी आणि या रोगामुळे मरण पावलेल्यांचा शोक व्यक्त करण्यासाठी हा दिवस पाळावा असे संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केले आहे. सरकारी आणि आरोग्य अधिकारी, अशासकीय संस्था आणि जगभरातील व्यक्ती एड्स प्रतिबंध आणि नियंत्रणावरील शिक्षणासह हा दिवस साजरा करतात. सन २०१७पर्यंत एड्समुळे जगभरात २.८९ कोटी ते ४१.५ कोटी लोकांचा मृत्यू झाला आहे आणि अंदाजे ३.६७ कोटी लोक एचआयव्ही सह जगत आहेत, ज्यामुळे हे अभिलिखित इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या जागतिक सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी एक आहे.

एड्स हा एक गंभीर आजार आहे. हा एक संक्रमित आजार असून या आजारामुळे जगभरात आतापर्यंत लाखो रूग्णांनी जीव गमावला आहे. ह्युमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस-एचआइव्हीमुळे होणाऱ्या ॲक्वायर्ड इम्यून डेफिशियन्सी सिंड्रोम- एड्स या गंभीर आजाराबद्दल जगभरात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि या आजाराने पीडित असलेल्या व्यक्तींना पाठिंबा दर्शवण्यासाठी आणि समर्थन देण्यासाठी दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून साजरा केला जातो.

एड्स या आजारासंदर्भात सर्व प्रकारच्या वयोगटातील लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या दिनाचा मुख्य हेतू आहे. आज जागतिक एड्स दिनच्या निमित्ताने आपण या दिवसाचा इतिहास आणि महत्व जाणून घेणार आहोत.

जागतिक एड्स दिनाचा इतिहास- एचआयव्हीचा प्रसार हा सर्वात आधी प्राण्यांपासून झाला होता. १९व्या शतकात आफ्रिकेतील माकडांच्या एका विशिष्ट प्रजातीमध्ये एड्सचा विषाणू पहिल्यांदा आढळून आला होता. हा रोग माकडांपासून माणसांमध्ये पसरला. आफ्रिकेमध्ये माकडे खाल्ली जात असत. त्यामुळे, हा रोग माकडांपासून माणसांमध्ये पसरल्याचे सांगितले जाते.

जागतिक आरोग्य संघटना- डब्ल्यूएचओने सर्वात आधी १ डिसेंबर १९८८मध्ये जागतिक एड्स दिनाची स्थापना केली होती. स्थानिक आणि राष्ट्रीय अधिकारी, आंतरराष्ट्रीय संस्था आणि नागरिकांमध्ये या आजाराच्या संदर्भात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांना या आजाराची माहिती मिळावी, यासाठी या दिनाची स्थापना केली होती. त्याप्रमाणे सन १९८८मध्ये पहिला एड्स दिन साजरा करण्यात आला. ज्यावेळी हा दिवस साजरा करण्यात आला त्यावेळी सुमारे ९० हजार ते १.५ लाख लोक एचआयव्ही पॉझिटिव्ह होते, असे सांगितले जाते. त्यामुळे वैद्यकीय जगतात खळबळ उडाली होती, त्यामुळे एड्सबद्दल किंवा एचआयव्हीबद्दल लोकांना शिक्षित आणि जागरूक करण्यासाठी जागतिक संस्थांना एकत्रित करून निधी देण्यावर भर देण्यात आला.

एड्स दिनाचे महत्व: मागील कित्येक वर्षांपासून जागतिक एड्स दिन हा साजरा केला जात आहे. हा एक गंभीर आजार आहे. अशा परिस्थितीमध्ये या आजाराबाबत सर्वांना जागरूक करण्यासाठी हा दिवस जगभरात साजरा केला जातो. जगभरातून या आजारास समूळ नष्ट करणे, हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे. तसेच, या आजारामुळे होणारे मृत्यू रोखणे आणि या आजाराने ग्रस्त असलेल्या पीडितांना योग्य उपचार देणे महत्वाचे आहे. सन १९८८पासून १ डिसेंबर रोजी प्रत्येक वर्षी जागतिक एड्स दिन साजरा केला जातो. यानिमित्ताने एड्स या आजारासंबंधी जागरूकता वाढवणे, एड्स या साथीच्या संसर्गाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि एचआयव्ही विरुद्ध लढ्यात सहभागी होण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. एड्स हा रोग ह्युमन इम्युनो डेफिशियन्सी व्हायरस- एचआयव्ही द्वारे होतो. एचआयव्ही शरीरातील रोगप्रतिकारक पेशी नष्ट करतो किंवा त्याचे नुकसान करतो.

एड्सची लक्षणे- एड्सची पहिली लक्षणे म्हणजे इन्फ्लूएंझा-फ्ल्यूसारखी लक्षणे किंवा सूजलेल्या ग्रंथी असू शकतात. परंतु काही वेळा लक्षणे दिसू शकत नाहीत. दोन किंवा तीन महिन्यांनंतर लक्षणे दिसू शकतात. घसा खवखवणे, स्नायू दुखणे, पुरळ, तोंड किंवा जननेंद्रियाच्या अल्सर, डोकेदुखी, ताप, मुख्यत: मानेवर सूजलेल्या लिम्फ ग्रंथी, सांधे दुखी, अतिसार, रात्री घाम येणे इत्यादी लक्षणे असू शकतात. एड्स होण्याची कारणे- एखाद्या व्यक्तीस अनेक मार्गांनी एचआयव्ही- एड्सची लागण होते. रक्त संक्रमण- काही प्रकरणांमध्ये रक्त संक्रमणाद्वारे व्हायरस संक्रमित केला जाऊ शकतो. एकच इंजेक्शन वापरणे- संक्रमित रक्ताने दूषित झालेल्या सुया आणि सिरिंजच्या माध्यमातून एचआयव्ही संक्रमित केला जाऊ शकतो. लैंगिक संपर्कः एचआयव्ही संक्रमण ज्यामुळे अधिक पसरते ती संक्रमण म्हणजे लैंगिक संपर्क होय. आईपासून मुलापर्यंत: एचआयव्ही विषाणूची लागण असलेली गर्भवती महिला त्यांच्या सामायिक रक्त परिसंचरणातून तिच्या गर्भावर व्हायरस संक्रमित करू शकते किंवा संक्रमित आई आपल्या दुधातून आपल्या बाळामध्ये विषाणू संक्रमित करू शकते. या गोष्टी करण्याने एड्स होत नाही- हात मिळवणे, मिठी मारणे, चुंबन, शिंका येणे, अखंड त्वचेला स्पर्श करणे, समान शौचालय वापरणे, एकच टॉवेल वापरणे, एचआयव्ही ग्रस्त व्यक्तीचे लाळ, अश्रू, मल आणि मूत्र याद्वारे एचआयव्ही पसरत नाही.

एड्स दिवस, जो आज संपूर्ण जग साजरा करत आहे, त्याची संकल्पना थॉमस नेटर आणि जेम्स डब्लू.बन यांनी सन १९८७मध्ये मांडली होती. थॉमस नेटर आणि जेम्स डब्ल्यू.बन हे दोघेही स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या एड्स ग्लोबल प्रोग्रामसाठी सार्वजनिक माहिती अधिकारी होते. त्यांनी एड्स दिनाची त्यांची कल्पना डॉ.जोनाथन मुन, एड्स ग्लोबल प्रोग्रामचे संचालक यांच्याशी शेअर केली, ज्यांनी या कल्पनेला मान्यता दिली आणि सन १९८८पासून, १ डिसेंबर हा जागतिक एड्स दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. सुरुवातीला जागतिक एड्स दिन केवळ लहान मुले आणि तरुणांशी संबंधित होता, परंतु नंतर एचआयव्ही संसर्ग कोणत्याही वयोगटातील लोकांना होऊ शकतो, असे आढळून आल्यानंतर सन १९९६मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक स्तरावर एड्सचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम हाती घेतले आणि सन १९९७पासून जागतिक एड्स मोहीम सुरू केली.

एचआयव्ही हा एक गंभीर आजार आहे जो एक प्रकारच्या प्राणघातक संसर्गामुळे होतो. एड्सचे पूर्ण नाव अक्वायर्ड इम्यून डेफिशियन्सी सिंड्रोम आहे. हा एक प्रकारचा विषाणू आहे, ज्याचे नाव एचआयव्ही- ह्युमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस आहे. या आजारात संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीवर हा व्हायरस हल्ला करतो. त्यामुळे शरीर सामान्य आजारांशीही लढण्यास असमर्थ ठरते. विशेष म्हणजे हा आजार तीन टप्प्यात होतो, प्राथमिक अवस्था, वैद्यकीय विलंब आणि एड्स. सन १९५९ साली काँगोमध्ये आढळला पहिला रुग्ण. असे मानले जाते की, १९व्या शतकात पहिल्यांदाच एड्सची लागण झाली होती. आफ्रिकेतील माकडांच्या विशिष्ट प्रजातीमध्ये एड्स चे विषाणू आढळले. हा रोग माकडांच्या माध्यमातून माणसांमध्ये पसरला. वास्तविक आफ्रिकेतील लोक माकडे खात असत, त्यामुळे माकडं खाल्ल्याने हा विषाणू मानवी शरीरात शिरला असावा, असे म्हटले जाते. सन १९५९मध्ये एचआयव्ही विषाणू पहिल्यांदा एका आजारी काँगोली माणसाच्या रक्ताच्या नमुन्यात त्याच्या मृत्यूनंतर आढळून आला. तो पहिला एचआयव्ही बाधित व्यक्ती असल्याचे मानले जाते. किन्शास हे त्या काळात देहव्यापाराचे केंद्र होते. अशा प्रकारे हा रोग देहव्यापार आणि इतर मार्गांनी इतर देशांत पोहोचला. सन १९६०मध्ये हा रोग आफ्रिकेतून हैती आणि कॅरिबियन बेटांवर पसरला. वास्तविक, हैतीयन लोक काँगोच्या वसाहती लोकशाही प्रजासत्ताकमध्ये काम करत असत. जिथे स्थानिक पातळीवर शारीरिक संबंधांमुळे हा आजार इतरांमध्ये पसरला. जेव्हा ते त्यांच्या घरी परतले, तेव्हा विषाणू त्यांच्याबरोबर हैतीला गेला. त्यानंतर १९७०च्या दशकात हा विषाणू कॅरिबियन ते न्यूयॉर्क शहरापर्यंत पसरला आणि नंतर अमेरिकेपासून उर्वरित जगामध्ये पसरला. पुढे १९८०नंतर हा रोग जगभर खूप वेगाने पसरला. तेव्हापासून जगभरातील लाखो लोकांना एड्समुळे आपला जीव गमवावा लागला आहे.

यावर्षीच्या जागतिक एड्स दिनाची थीम, लेट कम्युनिटीज लीड, एड्सनं बाधित समुदायांना नेतृत्व भूमिका घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा उद्देश आहे. ही थीम एड्सनं बाधित झालेल्या लोकांना आवाज उठवण्यास आणि त्यांचं जीवन सुधारण्यासाठी कृती करण्यास सक्षम असण्याची गरज अधोरेखित करते. एड्स बाधित लोकांना आरोग्य सेवा, शिक्षण आणि समान रोजगाराच्या संधी मिळायला हव्यात. जेणेकरुन डब्ल्यूएचओ अनुसार या थीमचा उद्देश पूर्ण होऊ शकेल. !! आंतरराष्ट्रीय एड्स जागरूकता दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

******

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# ठरत आहे मुलांसाठी धोकादायक, 'या' आजराला पडू शकतात बळी

आजकालच्या लहान मुलांना मोबाईल वापरण्याची खूप वाईट सवय लागली आहे. जेवताना तर हमखास लहान मुलांच्या हातात मोबाईल दिसतोच. याला थोड्या फार प्रमाणात पालक सुद्धा कारणीभूत आहेत. त्यात कोव्हीडनंतर ऑनलाईन क्लासेस मोठ्या प्रमाणात अनेक क्लासेस आणि कॉलेजेस घेऊ लागले. जे आज देखील चालू आहे. परंतु सतत ऑनलाईन क्लास अटेंड करणे तुमच्या मुलाचे आरोग्य बिघडवू शकते.

ऑनलाईन क्लासेससाठी मोबाईल, टीव्ही, कॉम्प्युटर सारख्या इलेक्ट्रॉनिक गॅझेटच्या अतिवापरामुळे मुलं व्हर्च्युअल ऑटिझम नावाच्या अजराला बळी पडत आहे. एका अहवालानुसार ऑटिझमच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. जगभरात या विषयावर अनेक संशोधने झाली आहेत, ज्यामध्ये हे स्पष्ट झाले आहे की ४-५ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये व्हर्च्युअल ऑटिझमचा धोका लक्षणीय वाढला आहे. मोबाईल फोन, टीव्ही, कॉम्प्युटर यांसारख्या इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सच्या व्यसनामुळे आजकाल मुलांना बोलण्याचे विकार देखील होत आहे.

सध्याच्या मॉडर्न लाइफस्टाइलमध्ये लहान मुलांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो. एक वर्षाची मुलेही फोन, टॅब आणि टीव्हीशिवाय अन्न खात नाही आहेत. यामुळे त्यांना अनेक आजार होण्याची दाट भीती असते.

यामुळे मुलांना असतो स्ट्रोकचं धोका

युनिव्हर्सिटी ऑफ ईस्टर्न फिनलंड आणि युरोपियन सोसायटी ऑफ कार्डिओलॉजी काँग्रेस २०२३ द्वारे केलेल्या संशोधनानुसार, जी मुले फोन वापरतात, त्यांना तरुण वयात हृदयविकाराचा धोका जास्त असतो. हे असे घडते कारण फोन पाहताना ते शारीरिकदृष्ट्या तितके सक्रिय नसतात. जे मुले कमी सक्रिय असतात त्यांना हृदय



व स्ट्रोकचा धोका जास्त असतो. वजन आणि प्रेशर जरी नियंत्रणात असले तरी हृदयविकाराचा झटका वाढतो. हे संशोधन १९९० आणि १९९१ मध्ये जन्मलेल्या १४,५०० मुलांवर करण्यात आले आहे.

जास्त स्क्रीन टाइम म्हणजे हृदयविकाराचा धोका

या संशोधनात असे आढळून आले आहे की जी मुले जास्त फोन आणि टॅब पाहतात, त्यांची शारीरिक हालचाल मंदावते. फोनवर जास्त वेळ घालवल्यास मुले गंभीर इकोकार्डियोग्राफी आजाराला बळी पडू शकतात. त्यामुळे ते शारीरिकदृष्ट्या निष्क्रिय होत आहेत.

मुलाचे स्क्रीन टाइम कसे कमी कराल?

आजकाल आई-वडील दोघेही नोकरी करत असल्यामुळे ते मुलांना जास्त वेळ देत नाहीत. पालकांनी आपल्या मुलांना जास्तीत जास्त वेळ द्यावा. त्यांच्याशी संवाद साधावा. तरच मुलं मोबाईलपासून दूर राहतील.

मुलांना घराबाहेर घेऊन उद्यानात जावा किंवा एखादा खेळ त्यांच्यासोबत खेळा.

मुलांना क्रिएटिव्ह हस्तकला, चित्रकला किंवा घरातील इतर गोष्टीत सामील करा.

सुट्टीच्या दिवशी, मुलांना त्यांची कामे जसे की त्यांच्या बॅग, शूज आणि इतर गोष्टी स्वच्छ करणे शिकवा.

मुलांना नृत्य, गायन, स्केटिंग किंवा ज्युडो कराटे यांसारख्या त्यांच्या आवडत्या गोष्टी शिकवा.

# हिवाळ्यात जेवणाची चव वाढवण्यासाठी जेवणात बनवा मुळ्याची चविष्ट चटणी, वाचा सिंपल रेसिपी

हिवाळ्यात बाजारात भरपूर पालेभाज्या उपलब्ध असतात. पालेभाज्या खाल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. या भाज्यांमध्ये असलेले गुणधर्म आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहेत. या दिवसांमध्ये बाजारात पालेभाज्या, बीट, गाजर इत्यादी अनेक फ्रेश भाज्या उपलब्ध असतात. अनेक घरांमध्ये हिवाळ्यात फक्त पालेभाज्या बनवल्या जातात. पालेभाज्या खाल्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. अनेक घरांमध्ये मुळ्याची भाजी बनवली जाते तर काहींच्या घरी मुळ्याचे पराठे बनवले जातात. पण लहानमुलांसह मोठ्यांसुद्धा मुळ्याची भाजी खायला आवडत नाही. मुळ्याच्या भाजीला उर्ग वास येतो म्हणून अनेक घरांमध्ये मुळा आणला जात नाही. पण आरोग्याच्या दृष्टीने मुळ्याची भाजी अतिशय पौष्टिक आणि चवदार आहे. आज आम्ही तुम्हाला मुळ्याच्या भाजीपासून जेवणात चविष्ट चटणी कशी बनवायची याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया रेसिपी. (फोटो सौजन्य-ळींेलज्ञ)

नवनवीन रेसिपीसाठी इथे क्लिक करा

साहित्य:

- टोमॅटो
- पाकळ्या
- हिरव्या मिरची
- मुळा
- कोथिंबीर
- धणे पावडर
- जिरे पावडर
- चाट मसाला
- लिंबाचा रस
- मीठ
- लाल तिखट
- तेल





नवनवीन रेसिपीसाठी इथे क्लिक करा

कृती:

मुळ्याची चटणी बनवण्यासाठी, सर्वप्रथम मुळा स्वच्छ धुवून त्याची वरची साल काढून किसून घ्या.

कढईमध्ये तेल गरम होण्यासाठी ठेवा. तेल गरम झाल्यानंतर त्यात लसूण पाकळ्या, टोमॅटो आणि हिरव्या मिरच्या टाकून व्यवस्थित परतून घ्या.

गॅस बंद करून सर्व मिश्रण थंड होण्यासाठी ठेवा. थंड झाल्यानंतर खलबत्यामध्ये ठेवून त्यात बारीक किसून घेतलेला मुळा आणि कोथिंबीर टाकून मिक्स करा.

नंतर त्यात चवीनुसार मीठ, लाल तिखट, चाट मसाला, धणेपूड, जिरेपूड, लिंबाचा रस घालून बारीक कुटून घ्या.

तुमच्याकडे खलबत्ता नसेल तर तुम्ही मिक्सरमधून फिरवून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली मुळ्याची चटणी.

# यशदातील अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांचा पीएचडी प्राप्त झाल्याबद्दल सत्कार



अहमदपूर :- यशदा पुणे येथील अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांना नुकतीच 'लोकप्रशासन 'या विषयात पी. एच. डी. पदवी मिळाल्याबद्दल व त्यांनी आतापर्यंत २५ हून अधिक पदव्या संपादन केल्याबद्दल अहमदपूर येथील अंनिस कार्यकर्ते यांच्यावतीने डॉ. बबन जोगदंड साहेब यांनी आतापर्यंत पंचवीस डिग्र्या घेऊन लिमकाबुक मध्ये नोंद झाली आहे. ते यशदा मध्ये कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून कार्यरत आहेत . त्यांना आज स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे ही दुसरी पीएचडी प्राप्त झालेली आहे त्याबद्दल सरांचे आज सत्कार करण्यात आला. डॉ बबन जोगदंड बोलताना जीवनामध्ये मोठं व्हायचं असेल तर मोठी स्वप्न पाहावीत, त्याचबरोबर संवाद कौशल्य, इंग्रजी भाषा, तंत्रज्ञान, आत्मविश्वास आणि कष्ट ही पंचसूत्री जीवनामध्ये अंगीकारावी, असे आवाहान यशदा पुणे येथील अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पोस्ट मास्तर भालचंद्र आलापुरे. नांदेड जिल्हा परिषदेचे सर्व शिक्षा अभियानाचे सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास ढवळे, नांदेड जिल्हा परिषदचे जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे हे होते तर या वेळी मेघराज गायकवाड. जोगोलकिशोर शार्म. पुजा गायकवाड.अमीत गाजरे. संतोष जावळे. जगदिश पेडलवाड. आत्माराम गुटे.डि जे वाघमारे.रुपेशकुमार कांबळे. प्रशांत क्षिरसागर. दयानंद जाधव.शिवहार कसनुरे .यांची उपस्थिती होती.

# लातूरच्या त्या मुख्याध्यापकाने १४ मुलींचा विनयभंग केला? मुख्याध्यापकाला तात्काळ निलंबित करून त्याच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला.

लातूर :- मराठवाड्यात लाजिरवाणी घटना ३० नोव्हेंबर रोजी घडली आहे.लातूरमध्ये शिक्षकी पेशाला काळीमा फासणारे कृत्य जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकांनी केले आहे. लातूर जवळील हरंगुळ (खुर्द)या गावी जिल्हा परिषदेच्या मुख्याध्यापकाने १४ मुलींचा विनभंग केल्याची घटना आज दि ३०/११/२०२४ रोजी घडली आहे. या घटनेने हरंगुळ येथील जनता व पालक मोठ्या प्रमाणात संतप्त भावना व्यक्त करताना पाहायला मिळत आहेत.या

प्रकरणाविरोधात तात्काळ ाळवल पोलीस स्टेशन लातूर या ठिकाणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.याप्रकरणी मुख्याध्यापकाला तात्काळ निलंबित करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. या घटनेनंतर लातूर जिल्ह्यात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेतेच्या बाबतीत प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहेत.या घटनेबाबत विद्यार्थिनींनी पालकांना याबाबत सविस्तर माहिती दिली असता, पालकांनी तात्काळ मुख्याध्यापकाला या घटने बाबत चौकशी करून,गट शिक्षण अधिकाऱ्याकडे या घटनेची तक्रार करण्यात आली असून यानंतर शाळेत विशाखा समिती स्थापन करण्यात आली आहे.या समितीमार्फत १४ पीडित मुलींच्या तक्रारीची चौकशी करण्यात आली असून मुख्यध्यापकांनेच या १४ मुलींचा विनयभंग केल्याचं निष्पन्न झाले असून, मुख्याध्यापका विरोधात एमआयडीसी पोलीस स्टेशन या ठिकाणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटने विरोधात पोलीस पुढील तपास करत आहेत.

# व्हाईस ऑफ मिडीया डिजिटल मिडीया विंगच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी डॉ.सितम सोनवणे

लातूर दि.३०-११-२०२४ व्हाईस ऑफ मिडीया डिजिटल मिडीया विंगच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी डॉ.सितम सोनवणे यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांची ही निवड व्हाईस ऑफ मिडीयाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, डिजिटल मीडिया विंगचे प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार, डिजिटल मिडीया विंगचे प्रदेश सचिव ईरशाद शेख यांच्या आदेशानुसार करण्यात आली असून या संबंधीचे पत्र व्हाईस ऑफ मिडीयाचे प्रदेश कार्याध्यक्ष विजय चोरडीया यांच्याहस्ते त्यांना प्रदान करण्यात आले.



यावेळी व्हाईस ऑफ मिडीयाचे लातूर जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार, कार्याध्यक्ष शहाजी पवार, इलेक्ट्रॉनिक विंगचे राज्य उपाध्यक्ष दीपरत्न निलंगेकर, व्हाईस ऑफ मिडीयाचे मराठवाडा कार्यवाहक बाळासाहेब जाधव, रेणापूर तालुकाध्यक्ष विठ्ठल कटके, देवणीचे तालुकाध्यक्ष रेवण मळभागे, लातूर तालुकाध्यक्ष प्रभाकर शिरूरे, काकासाहेब घुटे, देडे, व्हाईस ऑफ मिडीयाचे उपाध्यक्ष योगीराज पिसाळ, चाकूरचे तालुकाध्यक्ष विनोद निडवदे, जळकोट तालुकाध्यक्ष ॲड.अमोल कळसे आदी मान्यवर उपस्थित होते.

त्यांच्या निवडीबद्दल लातूर शहर व परिसरातून अभिनंदन होत आहे.

# फेंगल वादळामुळे ४ राज्ये प्रभावित

चेन्नई : बंगालच्या उपसागरातून उगम पावलेले फेंगल वादळ शनिवारी संध्याकाळपर्यंत पुद्दुचेरीतील कराईकल आणि तामिळनाडूतील महाबलीपुरम दरम्यानच्या किनारपट्टीवर धडकणार आहे. त्याचा परिणाम कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातही दिसून येत आहे. तामिळनाडूत ९० किमी प्रतितास वेगाने वारे वाहतील असा इशार देण्यात आला आहे. तामिळनाडू आणि पुद्दुचेरीच्या अनेक भागात पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. चेन्नईत मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय झाले आहेत. येथील एका एटीएमजवळ शॉर्टसर्किट होऊन विजेचा धक्का लागून एकाचा मृत्यू झाला आहे. या जिल्ह्यांतील लोकांना घराबाहेर न पडण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तामिळनाडूमध्ये बचाव कार्यासाठी एनडीआरएफच्या ७ तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. प्रत्येक तुकडीमध्ये ३० सैनिक आहेत. अनेक शहरांवर परिणाम शहरातील अनेक उड्डाणांवरही परिणाम झाला आहे. सायंकाळी ७ वाजेपर्यंत विमानतळ बंद ठेवण्यात आले आहे. अनेक गाड्याही नियोजित वेळेपासून उशिराने धावत आहेत.



# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त समस्त लातूरकरांच्या वतीने सामूहिक महा बुद्धवंदना अभिवादन कार्यक्रम



लातूर :- महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त समस्त लातूरकरांच्या वतीने सामूहिक महा बुद्धवंदना अभिवादन कार्यक्रम शुक्रवार ६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ७:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर या ठिकाणी आयोजित केला आहे.तरी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वतः पूज्य भिक्खू पय्या नंद थेरो हे १४, १५ डिग्री तापमानात रात्री कडाक्याच्या थंडीत लातूर शहरातील अनेक बौद्ध वस्ती मध्ये फिरून बौद्ध उपासक व उपासिका यांना पांढरे वस्त्र परिधान करून या व कार्यक्रमाला वेळेवर उपस्थित रहा असे आव्हान पू. भिक्खू पय्यानंद थेरो करीत आहेत.

# बाजारात भाजीपाल्याचे दरात घसरण

लातूर : प्रतिनिधी शहरातील महात्मा फुले भाजी मंडईत गत दोन अठवडयापासून भाजीपाल्याची आवक वाढत असल्याने किरकोळ बाजारात भाजीपाल्याच्या दरात घसरण होत आहे. भाव कमी असल्याने सर्वसामान्य जनतेतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. विशेषत: पालेभाज्यांच्या भावात चांगलीच घसरण झाल्याचे दिसून येत आहे.

शहरातील भाजीपाल्यासह पालेभाज्यांचे दर कमी झाल्याचे पाहायला मिळते आहे. सध्या पालेभाज्यांच्या जुडीची १० ते २० रुपयांपर्यंत उतरले आहेत. या पालेभाज्यांची जुडी काही दिवसापूर्वी ५० ते ६० रुपयाने विक्री होत होती. सध्या पोषक वातावरण आणि वाढत असलेली आवक यामुळे मेथी, पालक, शेपू या पालेभाज्यांच्या जुडीचे भाव आवाक्यात आले आहेत. यामुळे पालेभाज्या खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी वाढत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून पालेभाज्यांचे भाव चांगलेच वाढले होते. त्यामुळे पालेभाज्यांचे खरेदी कमी झाली होती. पण गेल्या आठ दिवसांपासून जिल्ह्यासह शेजार जिल्ह्यातून पालेभाज्यांची आवक वाढली आहे. त्यामुळे पालेभाज्यांचे दर खाली आले आहेत.



मेथी, पालक, शेपू, कांदा पात या भाज्या १० रुपयांना मिळत आहेत. याबरोबरच इतर पालेभाज्यांना ग्राहकांकडून मागणीही वाढली आहे. पालेभाज्यांबरोबर भाज्यांचेही भाव उतरत आहेत. वांगे, भेंडी, कोबी, वरणा, काकडी, भोपळा यासह अन्य कारला, दोडके, सिमला मिरची आदींची भावे ३० ते ४० रुपये प्रतिकिलोच्या दरात आहे. फुल कोबी, पत्ता कोबी, गाजर, पालक, मेथी आदींचे भावही आटोक्यात आले असल्याचे व्यापारी मिनाझ बागवान यांनी एकमतशी बोलताना सागीतले आहे. भाज्यांचे भाव सर्वसामान्यांच्या आवाक्यात आले आहेत. मात्र टोमॅटो, गवार याचे दर अद्याप उतरले नाहीत. त्यामुळे या भाज्यांची कमी प्रमाणात खरेदी ग्राहकांकडून होत आहे. याशिवाय कांद्याचे भावही उतरले असून १०० रुपयांना चार किलो, या दराने बाजारात मिळत आहेत.

शहरातील कृषी उत्पन्न बाजारात शेतमालाची आवक कमी होत असल्याने भाजीपाल्याला चागला दर मिळाला होता. कोथिंबीर, मेथी, काकडी, मिरची, दोडका आदी पालेभाज्या ४० ते ५० रुपये प्रति किलो दराने विकली जात होती. सध्या थंडीची लाट पसरल्यामुळे भाजीपाला पिकांना पोषक वातावरण तयार झाल्याने, त्यांच्या उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे बाजार समितीत भाजीपाल्याची आवक वाढल्याचे पाहायला मिळत आहे. महात्मा फुले बाजार समितीत महिन्यांपूर्वी पालेभाज्यांने तब्बल ६० ते ८० रुपये प्रतिकिलो असा उच्चांक गाठला होता. मात्र गेल्या आठ दिवसांपासून भाजीपाल्याच्या दरात घसरण होत असल्याचे व्यापारी वर्गानी सागीतले आहे.

मागील काही महिन्यांत भाज्यांचे दर वधारलेले पाहायला मिळत होते. भाज्यांच्या वाढलेल्या दराने सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागत होती. मात्र सध्या लातूर जिल्ह्यात भाज्याचे दर कमी झालेले आहेत. भाज्यांचे दर कमी झाल्याने सर्वसामान्यांना थंडीत वेगवेगळ्या भाज्यांचा आस्वाद घेता येत आहे. स्वयंपाकातील फोडणीचा महत्त्वपूर्ण घटक असलेल्या लसणाचा भाव मात्र तेजीतच आहे. शहरातील बाजारात लसणाचा भाव ४०० रुपये किलो इतका होता. गेल्या अनेक दिवसांपासून लसणाचे भाव वाढले असून पुढील काहि दिवस लसनाचे भाव तेजीत राहतील असे, व्यापा-यांनी सागीतले.

# स्वत:च्या फायद्यासाठी देहविक्रय करून घेणाऱ्या महिलेला अटक. दोन पीडित महिलांची सुटका

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई,

स्वतःच्या फायद्यासाठी देहविक्रय करून घेणाऱ्या महिलेला अटक. दोन पीडित महिलांची सुटका या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, लातूर शहरातील बार्शी रोड परिसरामध्ये एक महिला स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बाहेरून स्त्रियांना बोलावून घेऊन डायमंड स्पा च्या नावा खाली त्यांच्याकडून देहविक्रीचा व्यवसाय करून घेत आहे.

सदर माहितीची खातरजमा केल्यानंतर सदरची बाब खरी असल्याचे निदर्शनास येताच दिनांक २७/११/२०२४ रोजी पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे ,अप्पर पोलीस अधीक्षक श्री.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्रीमती बबिता वाकडकर यांच्या नेतृत्वात एएचटीयु पथकाने बनावट ग्राहक पाठवून मिळालेल्या माहितीची सत्यता पडताळून ती खरी असल्याचे निदर्शनास येताच लातूर शहरातील बार्शी रोड परिसरातील डायमंड स्पा वर छापा मारला

त्याठिकाणी देहविक्री करीत असताना दोन पिडीत महिला व वेश्या व्यवसाय करून घेणारे एक महिला आढळून आले.

तसेच पिडीत महिलांकडून देहविक्रय व्यवसाय करून घेणारे, स्वतःच्या फायद्यासाठी बाहेर गावाच्या महिलांना स्वत:चे स्पा मध्ये ठेवून त्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून स्पा च्या नावाखाली वेश्या व्यवसाय करून घेतात व आम्हाला काही रक्कम देऊन आमची राहण्याची खाण्यापिण्याची व्यवस्था करतात असे पीडित महिलांनी सांगितले.

सदर प्रकारा बाबत पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर नंबर ८४०/२०२४ कलम १४७ भारतीय न्याय संहिता व ३, ४, ५, अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियम १९५६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून कुंटणखाना चालणाऱ्या महिलेला अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्रीमती बबिता वाकडकर, पो.उपनि. शामल देशमुख, सुभाष सूर्यवंशी, पोह.सदानंद योगी,प्रकाश जाधव,मपोह.सुधमाती यादव, निहाल मनियार सर्व ने. आनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष पथकाने केली आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे एमआयडीसी चे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे करीत आहेत.

# लातुरात रंगणार जिल्हास्तरीय युवा महोत्सव

लातूर : प्रतिनिधी क्रीडा व युवक सेवा आयुक्त कार्यालय, क्रीडा व युवक सेवा उपसंचालक कार्यालय, लातूर जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते ७ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२४-२५ चे आयोजन करण्यात आले आहे. लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृह व जिल्हा क्रीडा संकुलाच्या इनडोअर हॉल येथे हा युवा महोत्सव होईल.

युवकांचा सर्वांगिण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त कला गुणांना वाव देणे व त्यांना एक खुले व्यासपीठ करण्याच्या हेतूने राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणे, युवकांना विज्ञान व तंत्रज्ञानाचे महत्व पटवून देणे, शिक्षण, उद्योग-व्यवसाय यासोबतच शेती या व्यवसायासी युवकांची ओळख करुन देणे, सामाजिक विकासात विज्ञानाचे महत्व युवकांना पटवूण देणे, हा युवा महोत्सवाचा मुख्य हेतू आहे. यातील सांस्कृतिक कला प्रकारात समूह लोकनृत्य (सहभाग संख्या १०), कौशल्य विकास प्रकारात कथा लेखन, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, कविता स्पर्धा, संकल्पना आधारीत स्पर्धा, विज्ञान व तंत्रज्ञान यातील नवसंकल्पना आधारीत विज्ञान प्रदर्शन होणार आहे.

जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये लातूर जिल्ह्यातील १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती सहभाग घेऊ शकतात. यात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, संगीत अकॅडमी, महिला मंडळ, महिला बचत गट, युवकांसाठी कार्य करणा-या स्वयंसेवी संस्था, नेहरु युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) इत्यादी संस्थेतील युवक व युवती यांना सहभागासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.



युवा महोत्सवामध्ये प्रत्येक कलाप्रकारासाठी विजयी स्पर्धकांना आकर्षक रोख बक्षीस, स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील १५ ते २९ वयोगटात असलेल्या पाच युवकांची नावे विभाग स्तरावर होणा-या स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार आहेत. तसेच विभाग स्तरावरुन पाच युवकांची नावे राज्य स्तरावर होणा-या स्पर्धेसाठी पाठविण्यात येणार असून राज्य स्तरावरुन एकुण १० युवकांना राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी पाठविण्यात येणा-या संघामध्ये प्रवेश देण्यात येणार आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE